Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-4 | April - 2025

Original Article

# पेसा कायदा (1996) आणि वन हक्क कायदा (2006) नुसार आदिवासींचा विकासात होत असलेला बदल

**Mr. Navnath Laxman Shewale[1], Dr. Sunil Nana Sandanshiv[2]**
[1]Assistant Teacher -Vasantrao Naik Madhyamik vidyalaya, Shahada.
[2]Professor - Uttamrao Patil Arts and Science College, Dahivel, Dist- Dhule.
**Email:** navnathshewales@gmail. com

**Manuscript ID:**
JRD -2025-170424
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 4|
Pp. 121-124
April 2025
**Submitted:** 04 Mar. 2025
**Revised:** 10 Mar. 2025
**Accepted:** 25 Apr. 2025
**Published:** 30 Apr. 2025

*सारः-*

*आदिवासींच्या विकासातील उणिवा दूर करण्याच्या दृष्टीने केंद्र शासन व राज्य शासन यांच्या मार्फत विविध उपाय योजना राबविल्या जात आहे. केंद्र शासनाने पारित केलेले पंचायत क्षेत्र विस्तार कायदा (पेसा कायदा) 1996 आणि वन हक्क कायदा 2006 हे दोन्ही कायदे आदिवासींच्या विकासामध्ये मोठी भूमिका बजावू शकणार आहे. महाराष्ट्र शासनाने सन 2015 मध्ये एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे तो म्हणजे आदिवासी विभागाच्या एकूण बजेटच्या 5% इतकी रक्कम आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये मुक्त निधी (अबंध निध) म्हणून प्रत्येक पेसा गावाला देऊन गावाचे विकासाचे सर्व अधिकार ग्रामसभेला देण्यात आले आहे. या अधिकारामुळे आदिवासींच्या विकासाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पेसा कायद्यानुसार तरतूद करण्यात आलेल्या या निधीला ग्रामसभा कोष निधी असे म्हटले जाते. याचाच एक भाग म्हणून यापुढे पेसा कायदा 1996 आणि वन हक्क कायदा 2006 या दोन कायद्यांचा वापर करून पेसा गावांचे गाव विकास आराखडे तयार करून पेसा गावाला देण्यात आलेल्या ग्रामसभा कोषाच्या माध्यमातून मिळणाऱ्या मुक्त निधीचा वापर करून ग्रामसभेच्या माध्यमातून आदिवासींच्या विकासाला चालना देता येणार आहे.*

***शोध संज्ञा:-*** *आदिवासींचा विकास, पेसा कायदा व वन हक्क कायदा.*

**प्रस्तावना:-**

पंचायत क्षेत्र विस्तार कायदा (पेसा कायदा) 1996 आणि वन हक्क कायदा 2006 हे दोन महत्त्वाचे कायदे केंद्र शासनाने पारित केलेले आहे. या दोन कायद्यान्वये आदिवासींच्या जीवनामध्ये मोठा बदल घडून येणार आहे. पेसा कायद्यामध्ये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार विकास योजनांना मान्यता देणे व त्यांच्या अंमलबजावणीवर नियंत्रण ठेवणे, लाभधारकांची निवड करणे, कामाचे मूल्यमापन करणे, गौण(वनसंपत्ती) पणीसाठ्यांचे ,गौण खनिजाचे व गौण वन उपजांचे व्यवस्थापन करणे, आदिवासींच्या जमिनीच्या हस्तांतरणाला निर्बंध घालणे, त्याचप्रमाणे सावकारी व बाजार नियंत्रण ठेवणे याबाबतचे महत्त्वाचे अधिकार ग्रामसभेला प्रदान करण्यात आले आहे.

वन हक्क कायद्यानुसार वन जमीन धारण करण्याचा, जंगलामध्ये निवास करण्याचा, गौण वन(वनसंपत्ती) उपजेचे व्यवस्थापन करण्याचा व जंगलातील परंपरेने प्राप्त झालेले अधिकार धारण करण्याचा त्याचप्रमाणे विकास कामासाठी वन जमीन मिळवण्याचा अधिकार आदिवासी व परंपरागत व निवासी यांना बहाल करण्यात आला आहे. त्याचबरोबर जंगलाचे जतन व संवर्धन करण्याचा तसेच जंगलामधील जैवविविधता व पशुपक्षी यांचे रक्षण करण्याची जबाबदारी वन हक्क धारकांवर व ग्रामसभेवर

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*Mr. Navnath Laxman Shewale, Assistant Teacher -Vasantrao Naik Madhyamik vidyalaya, Shahada.*

**How to cite this article:**
*Shewale, N. L., & Sandanshiv, S. N. (2025). पेसा कायदा (1996) आणि वन हक्क कायदा (2006) नुसार आदिवासींचा विकासात होत असलेला बदल. Journal of Research & Development, 17(4), 121–124. https://doi.org/10.5281/zenodo.15544429*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15544429
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-4 | April - 2025

सोपविण्यात आली आहे.

ग्रामीण भागामध्ये राहणारे आदिवासी अजूनही बऱ्याच प्रमाणात आपल्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी जल जंगल आणि जमीन या घटकांवर अवलंबून आहे. या नैसर्गिक साधन संपत्तीवरील आदिवासींचे नियंत्रण काढून घेतल्यास त्याचा अत्यंत विपरीत असा परिणाम आदिवासींच्या जीवनावर होणार आहे, आदिवासींचा विकास साधण्याच्या दृष्टीने या दोन कायद्यामार्फत आदिवासींच्या हिताचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

जंगलामध्ये उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर सस्टेनेबल पद्धतीने केल्यास व वन अधिकाऱ्यांनी आणि ग्रामसभेने एकत्रितपणे काम केल्यास आदिवासींच्या विकासाला चालना मिळण्याबरोबर जंगलाचे जतन व संवर्धन देखील साधले जाणार आहे. पुरातन काळापासून जंगल आणि आदिवासी यांचे सहजीवन सुरू असून ते एकमेकाला पूरक देखील आहेत. वन हक्क कायद्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी झाली तर आदिवासी व जंगल या दोन्हींचे भविष्य चांगले असणार आहे एवढे मात्र निश्चित. अनुसूचित क्षेत्रातील गावांचे व ज्या ठिकाणी जंगल आहे अशा गावांचे पेसा कायदा आणि वन हक्क कायद्यातील तरतुदींचे आधारे या गावांचे दीर्घकालीन असे विकास आराखडे तयार करून त्याची अंमलबजावणी या कायद्यातील तरतुदी प्रमाणे केल्यास आदिवासींच्या विकासाबरोबरच वनांचे जतन आणि संवर्धन देखील मोठ्या प्रमाणावर होणार आहे. पेसा कायदा आणि वन हक्क कायद्या मार्फत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होणार आहे आणि हे सर्व काम ग्रामसभेच्या नियंत्रणाखाली करण्याची एक चांगली अशी नवी संधी आदिवासींसाठी प्राप्त झाली आहे.

**उद्दिष्टे:-**

* पेसा कायदा व वन हक्क कायद्यातील तरतुदींचा अभ्यास करणे.

* आदिवासींच्या विकास योजनेमध्ये पेसा कायदा व वन हक्क कायद्याचे विश्लेषण करणे.

**गृहितके:-**

* पेसा कायदा व वन हक्क कायद्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे झालेली दिसून येत नाही.

* पेसा कायदा व वन हक्क कायद्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी न होण्या मागचे मुख्य कारण म्हणजे आदिवासींची निरक्षरता व बेताची आर्थिक परिस्थिती, स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, शासकीय कर्मचारी, समाज माध्यमे, सुशिक्षित आदिवासी युवक यांची उदासीनता.

**शिक्षणाचा अभाव, आर्थिक परिस्थिती आणि कायदेशीर हक्कांची जाणीव:-**

पंचायत क्षेत्र विस्तार कायदा म्हणजे पेसा कायदा 1996 मध्ये अस्तित्वात आला. या कायद्याला संविधानातील संविधान असे देखील म्हटले जाते कारण हा कायदा 73 व्या घटना दुरुस्तीच्या भाग आहे. या कायद्यान्वये आदिवासी समाजाला ग्रामसभेच्या माध्यमातून स्वयंशासनाचा अधिकार बहाल करण्यात आला आहे. असे असले तरी पेसा कायदा व वन हक्क कायद्याची अंमलबजावणी योग्य रीतीने होताना दिसून येत नाही. आदिवासींचा विकास होण्याच्या दृष्टीने केंद्र शासन व राज्य शासन यांच्यामार्फत मोठ्या प्रमाणावर निधी पुरवला जातो. परंतु हा निधी गरीब आदिवासींपर्यंत योग्य प्रकारे पोहोचत नाही असे चित्र ग्रामीण भागामध्ये मुख्यतः मिळते. त्याला अनेक कारणे कारणीभूत आहेत. त्यामध्ये मुख्यतः आदिवासींमध्ये शिक्षणाचा अभाव असणे, आर्थिक परिस्थिती कमकुवत असणे, कायदेशीर हक्कांची जाणीव नसणे हे घटक कारणीभूत आहे. शिक्षण नसल्यामुळे शासन स्तरावर आदिवासींसाठी कोणत्या योजना आहेत आणि त्या त्या योजनांचा फायदा घेण्यासाठी काय करावे लागते याची माहिती अशिक्षित आदिवासींना होत नाही. आदिवासी समाज दऱ्या खोऱ्यात राहणारा असल्यामुळे आणि त्यांची आर्थिक परिस्थितीची गरिबीची असल्यामुळे त्यांना रोजगारासाठी पर राज्यांमध्ये स्थलांतर करावे लागते. त्यामुळे ते आपल्या मुलांना शिक्षण आणि चांगले आरोग्य देऊ शकत नाही, परराज्यात गेल्यामुळे त्यांच्यासाठी कोणते योजना आहेत याचा कोणताही त्यांना ठाव ठिकाणा राहत नाही. शासकीय योजनांचा फायदा घ्यायचा असेल तर आदिवासी सुशिक्षित असणे गरजेचे आहे. जर तेच सुशिक्षित नसतील तर पेसा कायदा व वन हक्क कायद्यातील तरतुदींचा आणि विकास योजनांचा त्यांना फायदा होणार नाही. त्याचप्रमाणे सुशिक्षित आदिवासी तरुण आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे देखील आदिवासींना अपेक्षित असे सहकार्य मिळत नाही. सामाजिक कार्यकर्ते आणि सुशिक्षित आदिवासी तरुणांनी पुढाकार घेतला तर समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत शासकीय योजना पोहोचू शकतात. आदिवासी समाज संपूर्णपणे शिक्षण प्रवाहामध्ये आला तर त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. शासनामार्फत आदिवासींच्या शिक्षणासाठी अनेक मोठे प्रयत्न केले जात आहे. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते गावातील सरपंच व सुशिक्षित आदिवासींनी शिक्षणाकडे लक्ष घातले तर समाजातील इतरही आदिवासींना चांगले शिक्षण उपलब्ध होऊ शकते. शासनामार्फत आलेला शैक्षणिक निधी आदिवासींसाठी योग्य प्रकारे खर्च केला जात आहे किंवा नाही याची शहानिशा वरील तिन्ही घटकांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. शिक्षणाच्या दर्जा सुधारण्यासाठी स्थानिक सुशिक्षित लोकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. शिक्षणामध्ये आदिवासींची प्रगती झाली तर ते आपल्या कायदेशीर हक्कांबद्दल जागृत होतील आणि शासकीय विकास योजनांचा योग्य प्रकारे लाभ ते घेऊ शकतील.

**आदिवासी भागामध्ये नियमितपणे रोजगार उपलब्ध नसणे:-**

आदिवासी राहत असलेल्या भागामध्ये खास करून डोंगरदऱ्यामध्ये नियमित असा रोजगार उपलब्ध होत नाही. ज्या आदिवासींकडे थोड्याफार प्रमाणात शेती उपलब्ध आहे ते पावसाळ्याच्या पाण्यावर त्यांची शेती पूर्णपणे अवलंबून आहे. पाऊस चांगला

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-4 | April - 2025

झाला तर खाण्यापुरते अन्न पिकते. पाऊस जर कमी झाला तर उपासमारीची वेळ त्यांच्यावर येते. पाऊस प्रमाणापेक्षा जास्त झाला तरी देखील उपासमारीची वेळ आदिवासींवर येते. ज्या आदिवासींकडे स्वतःची जमीन नाही त्यांना सतत रोजगारासाठी परराज्यामध्ये कामावर जावे लागते. आदिवासी भागामध्ये पाऊस मोठ्या प्रमाणावर पडत असला तरी ते पाणी थांबवण्याची व्यवस्था मात्र पुरेशा प्रमाणात नाही. या भागामध्ये नद्यांना पाणी चांगले असले तरी ते धरणाच्या माध्यमातून अडवलेले दिसून येत नाही. काही ठिकाणी छोटे धरण पाहायला मिळतात परंतु त्यातील पाणी स्थानिक आदिवासींना पुरेसे होत नाही. आदिवासी भागातील अनेक आदिवासींकडे स्वतःची जमीन नसल्यामुळे ते शासन दरबारी स्वतःची हक्काची वन जमीन मिळावी यासाठी आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी शासनदरबारी लढा देत आहे.अनेक आदिवासींना अजूनही आपल्या हक्काची वन जमीन मिळालेली नाही.आदी काळापासून आदिवासींचे जीवन जल ,जंगल आणि जमीन या घटकांवरच अवलंबून राहिलेले आहे. भारत देशावर इंग्रजांचे राज्य स्थापित झाल्यानंतर ते भारत स्वतंत्र झाल्यावर देखील आदिवासींना अजूनही वन जमीन साठी लढा द्यावा लागत आहे. ज्या आदिवासींकडे स्वतःची हक्काची जमीन उपलब्ध नाही अशा आदिवासींना सामान्य जीवन जगता येईल एवढी तरी वन जमीन त्यांना मिळणे गरजेचे आहे.त्यासाठी शासन दरबारी आदिवासींना न्याय मिळण्यासाठी सक्षम नेतृत्वाची गरज आहे. आदिवासी भागामध्ये छोटे-मोठे उद्योगधंदे उदयास येणे गरजेचे आहे. त्यांना आपल्या भागामध्ये नियमितपणे रोजगार मिळाला तर त्यांचे जीवन सुखकर व्हायला मदत होईल. आदिवासी भागामध्ये पावसाळ्यात चांगला पाऊस पडतो. या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर धरणे बांधले गेली तर पिण्यासाठी आणि शेतीसाठी मुबलक पाणी तर मिळेलच परंतु सोबत मासेमारीच्या माध्यमातून रोजगार निर्माण व्हायला देखील मदत होईल.स्थानिक आदिवासींना विश्वासात घेऊन वनअधिकरांच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारचे झाडे लावण्यात यावे. यासाठी स्थानिक आदिवासींना चांगला रोजगार देण्यात आला तर झाडांचे जतन व संवर्धन अजून चांगल्या पद्धतीने होईल. वनात उपलब्ध असलेल्या वनसंपत्तीवर आदिवासींचे जीवन अवलंबून असल्याने स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने चांगली बाजारपेठ उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. आदिवासींना नियमितपणे रोजगार उपलब्ध झाला तर त्यांचे जीवनमान उंचावण्यास नक्कीच मदत होणार आहे.

पंचायत क्षेत्र विस्तार कायदा आणि ग्रामपंचायत विकास आराखडा:-

भारताच्या संविधानातील अनुच्छेद 40 मध्ये शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांचे बळकटीकरण करून त्यांना स्वराज्याचे मूळ घटक म्हणून काम करण्यासाठी जे अधिकार आणि प्रधिकार लागतील ते देण्यात यावे अशी तरतूद केली आहे. या तरतुदीमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन गावाचे विकासाचे निर्णय गावातच होतील आणि विकासाला चालना मिळेल असा त्या मागचा हेतू आहे. 73 व्या घटना दुरुस्ती मुळे ग्रामसभेला संविधानिक दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे ग्रामविकास संबंधातील सर्व निर्णय ग्रामसभेवर सोपविण्यात आले आहेत. पंचायत क्षेत्र विस्तार काय1996,वन हक्क कायदा 2006 आणि महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी कायदा 2005 या कायद्यान्वये ग्रामसभेला खूप मोठे अधिकार देण्यात आले आहेत.

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने नोव्हेंबर 2015 मध्ये महाराष्ट्र राज्यातील सर्व ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करून ग्रामसभेने मंजूर केलेल्या कामांना मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून गावाच्या विकासाचे अधिकार गावालाच प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करण्याचे प्रक्रिया ग्राम स्तरावर सुरू करण्यात आली आहे. अनुसूचित क्षेत्रामधील गावांना पंचायत क्षेत्र विस्तार कायदा 1996 लागू करण्यात आला असून या कायद्यान्वये गावांना स्वयंशासनाचे अधिकार बहाल करण्यात आले आहेत. त्यामुळे आदिवासींच्या विकासाला मोठी चालना मिळणार असल्याने तसेच केंद्र शासनाने एप्रिल 2016 च्या पत्राने अनुसूचित क्षेत्रातील गावांचे विकास आराखडे तयार करताना त्यामध्ये पंचायत क्षेत्र विस्तार कायदे 1996 मधील तरतुदींचा समावेश करावा असे कळविले आहे. त्यामुळे अनुसूचित क्षेत्रामधील सर्व पेसा गावांचे विकास आराखडे तयार होऊन त्यामधील कामे पुढील कालावधीत सुरू होतील. यामुळे आदिवासींच्या व्यक्तिगत व सामूहिक विकासाला त्याचप्रमाणे पेसा गावातील विकास कामांना फार मोठी चांगला मिळणार आहे.

**निष्कर्ष:-**

समाजाच्या मुख्य प्रवाहात आदिवासी समाज यावा यासाठी संविधानाच्या 73 व्या घटना दुरुस्ती अन्वये पेसा कायदा 1996 अस्तित्वात आला. या कायद्यान्वये ग्रामीण भागातील आदिवासींना वैयक्तिक आणि सामूहिक विकास साधण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतला स्वयंशासनाचा अधिकार बहाल करण्यात आलेला आहे. आदिवासींचा विकास होण्याच्या दृष्टीने केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या मार्फत मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतूद देखील करण्यात आलेली आहे. गाव विकासाचे निर्णय हे गावातच सर्वसंमतीने घेतले जाणार आहे. त्यामुळे प्रत्येकाला विकास प्रक्रियेमध्ये आपला स्वतःचा सहभाग नोंदविता येणार आहे. त्याचप्रमाणे वन हक्क कायदा 2006 हा कायदा देखील आदिवासींच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. या कायद्यान्वये आदिवासींना स्वतःच्या मालकीची शेतीसाठी जमीन मिळणार आहे व त्याद्वारे ते आपला आर्थिक विकास घडवून आणणार आहे. जंगलात असणाऱ्या जंगल संपत्तीवर आदिवासींचे जीवन अवलंबून असल्याने त्यांना अनेक अधिकार बहाल करण्यात आलेले आहे. पेसा कायदा व वन हक्क कायद्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाली तर तळागाळातील गरीब आदिवासींचा विकास होणार आहे. त्यासाठी शासन स्तरावरून शासकीय कर्मचारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते ,सुशिक्षित आदिवासी तरुण यांनी जागृत राहून या दोन्ही कायद्यांच्या अंमलबजावणी कडे लक्ष दिले तर आदिवासींचा विकास घडवून आणण्यामध्ये नक्कीच मदत होणार आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-4 | April - 2025

**संदर्भसूची :**

1. वाघमारे एम. एल. (2018) *पेसा कायदा 1996,वन हक्क कायदा 2006, ग्रामपंचायत विकास आराखडा आणि आदिवासींचा विकास*. पुणे, वैशाली प्रकाशन
2. निकम गौतम (2021) *आदिवासींचे संविधानिक अधिकार व पेसा ॲक्ट 1996*. चाळीसगाव, विमलकीर्ती प्रकाशन.
3. गारे गोविंद (2023). *आदिवासी विकासाचे शिल्पकार*, पुणे, श्रीविद्या प्रकाशन.
4. गारे गोविंद (2018). *आदिवासी विकासातील दीपस्तंभ*, पुणे, श्रीविद्या प्रकाशन.
5. देवगावकर एस. जी. (2016). *आदिवासी विकास प्रशासन*, नागपूर, साईनाथ प्रकाशन.
6. गारे गोविंद (2018). *स्वातंत्र लढ्यातील आदिवासी क्रांतिकारक*, पुणे, श्रीविद्या प्रकाशन.
7. गारे गोविंद (2019). *महाराष्ट्रील आदिवासी जमाती*, पुणे, कॉन्टीनेन्टल प्रकाशन.
8. गारे गोविंद (2013). *आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ*, पुणे, सुगावा प्रकाशन.
9. निकम गौतम (2019). *आदिवासींच्या समस्या एक अभ्यास*, चाळीसगाव, विमलकीर्ती प्रकाशन.